श्री. शिरिष ग. जोशी(अध्यक्ष) || श्री व्याघ्रेश्वर प्रसन्न || श्री जगदिश ग. रानडे(खजिनदार)

९०३५५८६११० **श्री व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार** ९८५०६६६५८९

द्वारा : श्री धनंजय श्री रानडे, कार्यवाह

४ रमा माधव, १०५/२, नारायण पेठ, पुणे - ४११०३०.

फोन : ९८२२२९५६१० आसूद दूरध्वनी :

**व्रत सेवेचे - भक्तीचे - ज्ञानाचे**

Website : www.vyaghreshvar.com रजि नं.:एफ - २२१४ Email : vkp.pune@gmail.com

दि. १८ /०७ /२०२४

## ‖ महारुद्र उत्सव - २०२४ निमंत्रण ‖

**मा. सभासद**,
श्री. व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार, स. न.

**जय व्याघ्रेश्वर !!** ... "श्रावण-सरीं"त चिंब भिजायला ... आपल्या कुलदैवतावर होणारा महारुद्राभिषेक सोहोळा बघायला ... त्यात सहभागी व्हायला ... आसूदला चला !! .... **श्रावणी सोमवार, १९ ऑगस्ट २०२४** रोजी, श्री. देव व्याघ्रेश्वराच्या दर्शनाला जायचे असे मनोमन निश्चीत करा व प्रवासाच्या तयारीला लागा !!

"महारुद्राच्या" आदल्या दिवशी, **रविवार दि. १८ ऑगस्ट २०२४** रोजी सा. ५.३० वा. श्रीं चे मंदिरात, इ.स. २०१५ पासून सुरु केलेली, **"चक्क्याची महापूजा"** संपन्न करण्यात येईल. ह्या पूजेचे **`यजमानपद'** ज्यांना स्वीकारायचे आहे त्यांनी न्यासाचे सचिव श्री. धनंजय रानडे यांचेशी संपर्क साधावा. पूजा झाल्यानंतर मस्त गप्पा गोष्टींसह सहभोजनाचा कार्यक्रम होईल.

यंदाच्याही श्रावणी "महारुद्र" उत्सवाचे **यजमानपद**, आपले **तहहयात मानकरी ठाण्याचे सौ. व श्री. मनिष श्रीकांत रानडे** यांनी स्वीकारले आहे. **सहयजमानपद** आपल्यापैकी कोणास भूषविण्याचे असल्यास कृपया श्री. धनंजय रानडे यांचेशी जरुर संपर्क साधावा (९८२२२९५६१० / ९४२३१३८३६५). **सहयजमानपदाचे देणगी शुल्क रु. १५,०००/- मात्र आहे**. दरवर्षीप्रमाणे यावर्षीचा महारुद्र, आपल्या कुलदैवताच्या; आसूद येथील "श्री. व्याघ्रेश्वर मंदिरात", **श्रावण पौर्णिमा, सोमवार दि. १९ ऑगस्ट २०२४** या सुदिनी सम्पन्न होणार आहे.

पुण्याह वाचन व यजमानांच्या संकल्पानंतर, ब्रम्हवृंदाच्या नादबद्ध रुद्रावर्तनास सुरवात होईल ती स. ७.३० वा. व दु. १.० वा. नंतर महाप्रसादाचा लाभ सर्व उपस्थित भक्तांना घेता येईल. महाप्रसाद झाल्यावर उत्सवाची सांगता होईल.

श्रावणात कोकणामध्ये भरपूर पाऊस असतो हे लक्षात घेवून उत्सवास उपस्थित राहू इच्छिणा-या भक्तांनी; आपले बरोबर योग्य ती तयारी ठेवावी (पुरेसे अंथरुण, पांघरुण, छत्री-रेनकोट, विजेरी इ.) जेणेकरुन संभाव्य गैरसोय टाळता येईल. तसेच **आपल्या उपस्थिती विषयीची निश्चिती (कितीजण व कधी येणार इ.) दि. १० ऑगस्ट २०२४ पूर्वी, सचिव श्री. धनंजय रानडे यांचेकडे पत्राने / दूरध्वनीने / एस.एम.एस / ई मेल द्वारे कळवावी"च" ही नम्र विनंती.** त्यामुळे योग्य नियोजन ठेवण्यास आम्हाला मदतच होइल ... सबब कर्तव्य-भावनेने, विहीत मुदतीत हे कळवून, आपण परिवाराची मंडळी शिस्त पाळतो हे दाखवून द्याल याची खात्री बाळगतो... असो

**सततची वाढती महागाई लक्षात घेता महारुद्रासाठी होणाऱ्या वाढत्या खर्चाची मिळवणी करण्यासाठी, आपणा सर्व व्याघ्रेश्वर भक्तांना आवाहन करतो की ...**

१. **उत्सव देणगी शुल्क, दिनांक १० ऑगस्ट अथवा त्यापूर्वी न्यासाच्या सेन्ट्रल बँक शाखेत online / किंवा upi id 11133810@cbin वर bhim / gpay द्वारा / किंवा पत्रकात दिलेला "स्कॅन कोड" स्कॅन करून रक्कम जमा करून तसे कळविल्यास रु. ३५०/- प्रतिव्यक्ती आकारले जाईल १० ऑगस्ट नंतर देणगी शुल्क रु. ४००/- प्रतीव्यक्ती आकारले जाईल**. कृपया याची नोंद घ्यावी.

२. उत्सवात होणाऱ्या खर्चातील पूर्णत: अथवा अंशत: (रु. ५००/- च्या पटीत) भार आपण उचलून आपण `श्री'कार्यात हातभार लावू शकता; जसे .. महारुद्र उत्सव कालात येणाऱ्या भक्तांची **चहा-कॉफी देणगी .. रु. ४०००/-** , उपस्थित भक्त, रुद्रात सहभागी होणारे गुरुजी यांचेसाठी **उपवासाच्या पदार्थाचा नाष्टा देणगी .. रु. ४०००/-** , महाप्रसादातील एक **गोड पदार्थ देणगी रु. ८०००/-** , महाप्रसाद बनविण्याचा **स्वयंपाक खर्चासाठी देणगी .. रु. १५०००/-** ,पूजेची तयारी, **फुले इ. साठी देणगी..रु. २०००/-** , उत्सवकाळात लागणारे **पाणी व इतर व्यवस्थापन खर्च देणगी रु. ३०००/- इ.** ..

३. महत्वाचे म्हणजे, दरवर्षी जमा झालेल्या रकमेतून खर्च वजा जाता शिल्लक राहिलेल्या रकमे इतकीच रक्कम न्यास भरुन त्यातून महारुद्रनिधी वाढवला जाईल; ज्याचा फायदा भविष्यातील उत्सव करण्यासाठी होऊ शकेल असे आम्हाला वाटते. .. असो ..

**न्यासाच्या स्थापनेपासून आजपर्यंत मदत केलेल्या अनेक स्वयंसेवकांची / देणगीदारांची संस्था कायम ऋणी राहील.** ज्यांचा कुलस्वामी श्री व्याघ्रेश्वर आहे अशा जास्तीत जास्त कुल-बांधवांशी संपर्क साधून त्यांना आपल्या न्यासाचे सभासद करुन घ्या असे नम्र आवाहन या पत्राद्वारे आपणास करतो.

आमचे समस्त व्याघ्रेश्वर भक्तांना नम्र आवाहन आहे की, आपण आपल्या वर्षभरातील आसूद भेटीत "शिवालयात" अथवा "भक्तनिवासा"तच वास्तव्य करून आम्हास आपली सेवा करण्याची संधी द्या तसेच आपल्या मित्रमंडळींना देखील या नव्या वास्तूत रहाण्यास प्रोत्साहन जरुर द्या. जुने "भक्तनिवास" तथा "शिवालया"च्या वास्तव्यासाठीच्या देणगीमुल्य, आरक्षण इ. साठी आमच्याशी संपर्क साधा व स्यूट/खोली आरक्षीत करु शकता. आपण आपल्या वेबसाईटवरुन देखील ऑनलाईन आरक्षण करु शकता .. या वर्षीच्या उन्हाळ्याच्या सुटीत 'शिवालय'ला भरभरुन प्रतिसाद मिळाला. या दरम्यान वास्तव्य केलेल्या भक्तांच्या सुचनेनूसार,`शिवालयातील उर्वरित दोन स्युट ए.सी करण्याचा मानस आहे. तसेच भक्तनिवास प्रांगणात देखील काही आवश्यक सुधारणा या वर्षी करून घ्यायचा मानस आहे. असो. .... धन्यवाद.

बहूत काय लिहिणे... आता आपली भेट... दि. १८ व १९ ऑगस्ट २०२४ रोजी होणाऱ्या "महारुद्र उत्सवातच" !! श्री.व्या. कु. प. न्यास व सौ.व श्री. मनिष श्रीकांत रानडे यांचे तर्फे आपणा सर्वांचे स्वागतोत्सूक...

**श्री. शिरीष गजानन जोशी (अध्यक्ष)** **धनंजय श्रीकृष्ण रानडे (सचिव)**

**श्री. व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार.**

<u>**देणगी शुल्क / देणगी / अंशत: देणगी जमा करण्यासाठी upi id व बँक डिटेल्स :**</u>

SHRI VYAGHRESHVAR KULA

11133810@cbin

सेव्हींग्स खात्याचे नाव : **श्री. व्याघ्रेश्वर कुलस्वामी परिवार** (: **Shri Vyaghreshvar Kulaswami Parivar**)

सेंट्रल बँक ऑफ इंडिया, डेक्कन जिमखाना, पुणे शाखा .. **सेव्ह. अकाऊंट नं : 1014330094**
**IFSC Code: CBIN0280655**

******